वर्ष-१० | अंक-०५ | मुंबई, मंगळवार, १९ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२३ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मुळ्याच्या चवीने आणि वासाने नाक मुरडू नका; यकृताच्या

3 → आदिवासींच्या आयुष्यात आरोग्यसेवेची पहाट

मुंबईत पुन्हा क्लीन अप मार्शल तैनात होणार ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## ''नाऽ निती, नाऽ नितीमत्ता''... धारावी मोर्चावरुन नारायण राणेंचा उद्धव ठाकरेंवर प्रहार



**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य सरकारने मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार, ह्या प्रकल्पाचं काम अदानी उद्योग समुहाला देण्यात आलं आहे. त्यास, शिवसेना उद्धव ठाकरे गटाने विरोध दर्शवला आहे. त्यावरुन, आता चांगलंच राजकारण होताना दिसत आहे. अदानी उद्योगसमुहाकडून होणाऱ्या धारावीच्या पुनर्विकासाविरोधात ठाकरे गटाने पुकारलेल्या महामोचार्ला उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली आहे. या मोर्चात शिवसैनिकांसह महाविकास आघाडी आणि डाव्या पक्षांचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले आहे. त्यावरुन, भाजपा नेत्यांनी शिवसेना (उबाठा) आणि उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं आहे. मुंबईतील धारावी टी जंक्शनपासून हा मोर्चा सुरू झाला असून अदानींच्या कार्यालयापर्यंत जाणार आहे. धारावीचा पुनर्विकास अदानींनी करण्याऐवजी तो स्वतः सरकारने करावा, अशी प्रमुख मागणी ठाकरे गटातील मोर्चेकऱ्यांकडून करण्यात येत आहे. यासह, मोर्चाच्या माध्यमातून काही मागण्याही होत आहेत. मात्र, हा मोर्चा केवळ राजकीय हेतुने आणि आर्थिक लाभासाठी असल्याचा आरोपही शिवसेनेवर होत आहे. विरोधकांकडून या मोर्चावरुन उद्धव ठाकरेंवर पलटवार केला जात आहे. केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनीही ट्विटरवरुन धारावी पुनर्विकासाला विरोध करणाऱ्या शिवसेना आणि महाविकास आघाडीवर टीका केलीय. उध्दव ठाकरे व त्यांच्या नादी लागून कॉंग्रेस व इतर पक्ष अदानी उद्योग समुहाविरोधात आता धारावीमध्ये मोर्चा काढत आहेत. दुसरीकडे उद्धव ठाकरेंचे बगलबच्चे आदरणीय साहेबांच्या जीवावर उठलेल्या पाकिस्तानातील दाऊदच्या साथीदाराबरोबर पार्टीमध्ये नाचत आहेत. वा रे उध्दव ठाकरे.. असे म्हणत केंद्रीयमंत्री नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंवर थेट प्रहार केला. मुख्यमंत्री असताना अडीच वर्षात धारावीकरांना उध्दव ठाकरे पाचशे चौरस फुटांचे घर देण्याचा निर्णय घेऊ शकले नाहीत. आता त्यासाठी मोर्चा काढत आहेत. सत्तेत असताना अडीच वर्षात तुम्ही का नाही दिले धारावीकरांना पाचशे चौरस फुटांचे घर?, असा प्रश्न राणेंनी विचारला आहे. तसेच, यांचे प्रेम धारावी आणि धारावीकरांवर नाही. यांचे खरे प्रेम टी.डी.आर. च्या मलईवर आहे. उध्दव ठाकरे यांना ना नीती, ना नितीमत्ता, स्वाथार्साठी काही पण... असे म्हणत नारायण राणेंनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शिंदे गटानेही साधला निशाणा

ठाकरे गटाच्या आजच्या मोर्च्यावर हल्लाबोल करताना शिदेंच्या शिवसेनेचे नेते राहुल शेवाळे यांनीही निशाणा साधला. ₹मुंबईतल्या बांधकाम व्यवसायिकांची सुपारी घेऊन उद्धव ठाकरेंचा आजचा धारावीतला मोर्चा आहे. स्वतःच्या आर्थिक हितासाठी उद्धव ठाकरेंचा हा मोर्चा असून टीडीआरबद्दल उद्धव ठाकरेंनी केलेले आरोप खोटे आहेत. ते स्वतः अडीच वर्ष मुख्यमंत्री होते, तेव्हा धारावीबद्दल काही का केलं नाही?₹ असा खोचक सवालही शेवाळे यांनी विचारला आहे.

## आमच्या हातात दंडूके, सरकारला पायाखाली तुडवू शकतो, भुजबळांनाही पाहून घेऊ : मनोज जरांगे



**■बीड। प्रतिनिधी,**

जिल्ह्यातील धारूर शहरातील मोंढा मैदानावरील मनोज जरांगे यांची सभा होत असून, पुन्हा एकदा त्यांनी आपल्या सभेतून सरकार आणि मंत्री छगन भुजबळांवर हल्लाबोल केला आहे. तर, आमच्या हातात दंडूके आहे, मराठा समाज सरकारलाही पायाखाली तुडवू शकतो आणि भुजबळांमध्ये किती दम आहे पाहून घेऊ, असे वक्तव्य जरांगे यांनी या सभेत केले आहे. त्यामुळे, त्यांच्या याच वक्तव्यावर आता भुजबळ काय प्रतिक्रिया देणार हे पाहणं महत्वाचे असणार आहे. दरम्यान, यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, त्याचं ऐकून मराठ्यांना आरक्षण दिले जाणार नसेल, तर गाठ मराठ्यांसोबत आहे. एकदा आरक्षण मिळू द्या, मग मी त्याच्याकडे बघणार आहे. खोटे गुन्हे दाखल करणाऱ्यांचा देखील आरक्षण मिळाल्यावर हिशोब करणार आहे. गोळीबार, लाठीमार होऊन देखील आंदोलक अजून मागे हटलेले नाहीत. 307 सारखे गंभीर गुन्हे आपल्यावर दाखल केले. पहिल्यांदा एवढं निर्दयी आणि निष्ठुर सरकार पाहिलं. सरकार किती लोकांना अडकवणार आहे. लक्षात ठेवा 6 कोटी मराठा आहे, असे जरांगे म्हणाले. पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की, ₹छगन भुजबळ यांचे ऐकून अन्याय करायचा असेल, तर सरकारला मराठा समाज सोडणार नाही. छगन भुजबळमध्ये किती दम आहे, हे आपण पाहून घेऊ. मराठा आरक्षणाचे पुरावे असतानाही आरक्षण दिले नाही. मराठा समाजाने इतरांसाठी छातीचा कोट केला, मात्र तेच लोक आता मराठा समाजाला विरोध करत आहेत. आत्तापर्यंत 39 लाख मराठा लोकांना आरक्षणाचा लाभ मिळाला आहे. आरक्षण नसल्याने मराठयांच्या नोकरीचा टक्का कमी झाला. त्यांना माहित नाही आमच्या हातात दंडूके आहेत. काही लोक जातीवाद निर्माण करून दंगली घडवण्याचा प्रयत्न करत आहेत. आरक्षणासाठी मी खूप अपमान सहन केला, पण समाजाने संयम ठेवावा. तर, मराठा समाज सरकारला पायाखाली तुडवू शकतो, असेही जरांगे म्हणाले.

**भाषण सुरु असतानाच रुग्णवाहिका आली...**

बीड जिल्ह्यातील धारूर येथे मनोज जरांगे यांची सभा होत आहे. या सभेसाठी परिसरातील मराठा बांधवांनी मोठी गर्दी केली आहे. त्यामुळे सभेचं ठिकाणी पाय ठेवायला देखील जागा नसल्याचे चित्र आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांचे भाषण सुरु असतानाच अचानक त्याठिकाणी एक रुग्णवाहिका आली. त्यामुळे उपस्थित आंदोलकांनी तत्काळ या रुग्णवाहिकेला जागा करून दिली. त्यामुळे कुठलाही अडथळा न येता ही रुग्णवाहिका तेथून गेली.

## जुन्या पेन्शनसंदर्भात राज्य शासन सकारात्मक

### निवडणुकीपूर्वी घेणार निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आश्वासन



**■नागपूर। प्रतिनिधी,**

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात राज्य सरकारने तीन सदस्यांची समिती स्थापन केली होती. समितीने आपला अहवाल राज्य सादर केला आहे. जुन्या पेन्शनसंदर्भात राज्य शासन सकारात्मक असून येत्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी याबाबत निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी विधान परिषदेत दिले. विधान परिषदेत नियम १०१ अन्वये, जुन्या पेन्शनसंदर्भात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित मुद्यावर सरकारतर्फे माहिती देतांना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात केंद्र सरकारस्तरावर सुध्दा वेगळा विचार सुरु आहे. कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतन, महागाई भत्ता यासंदर्भात केंद्र सरकारने वाढ केल्यानंतर राज्य सरकार सुध्दा त्याच पध्दतीने वाढ करत असते.

जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात केंद्र सरकारने निर्णय घेतल्यास त्याच धर्तीवर राज्यात सुध्दा निर्णय घेण्यात येईल. जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात सुबोधकुमार, के. पी. बक्षी आणि सुधीर श्रीवास्तव या तिघांची समिती स्थापन केल्यानंतर त्या समितीने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला आहे. त्याचबरोबर देशातील ज्या राज्यात जुन्या पेन्शन योजनेबाबत निर्णय घेण्यात आला आहे, त्याची माहितीही मागविण्यात आली आहे. ती माहिती आल्यानंतर त्याबाबतचा अभ्यास करण्यात येईल. जुन्या पेन्शन योजनेबाबत राज्य सरकार सकारात्मक असून येत्या विधानसभा निवडणुकीपूर्वी याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात दिले.

## 'एनआयए'कडून २० हून अधिक जणांची चौकशी; 'आयसिस'शी संबंध असल्याचा आरोप




**■मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र आयासिसा मॉडयूलशी संबंधित वीसहून अधिक जणांची राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) सोमवारी चौकशी केली. गेल्या आठवडयात टाकलेल्या विविध छाप्यांमध्ये जप्त केलेल्या साहित्याच्या आधारे एनआयएने ही चौकशी केली. त्यात आयसिसमध्ये सामील होण्यासाठी इराकमध्ये गेलेल्या आरिब माजिदचाही समावेश आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छाप्यादरम्यान एनआयएला हमास या दहशतवादी संघटनेचे झेंडे सापडले. ६ डिसेंबर रोजी इस्त्रायलच्या विरोधात काढण्यात आलेल्या रॅलीत अनेक लोक सहभागी झाले होते. या प्रकरणातील संशयित आरोपींसोबत या रॅलीमध्ये सहभागी झालेल्या तसेच त्यांच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना एनआयएने समन्स बजावले होते. त्यात मीरारोड, पडघा, बंगळूरु येथील व्यक्तींचा समावेश आहे. एनआयएने आयसिसशी संबंधित भिवंडी येथील पडघा येथे शनिवारी छापा टाकला. या कारवाईत संशयास्पद वस्तूंसह १५ संशयितांना अटक करण्यात आली होती.

गेल्या महिन्यात एनआयएने आयसिस आणि अल सुफा या दहशतवादी संघटनांशी संबंधित फरारी मोहम्मद शाहनवाज आलम (रा. झारखंड) याला दिल्लीत अटक केली होती. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली, अशी माहिती सूत्रांनी दिली. एनआयए आणि एटीएसच्या पथकाने ठाणे जिल्ह्यातील पडघा, मीरा रोड तसेच पुण्यासह राज्याच्या वेगवेगळया भागांत छापे टाकून दहा संशयितांना ताब्यात घेतले, तर उर्वरित पाच जणांना बंगळूरुतून अटक करण्यात आली. छाप्यांमध्ये मोठया प्रमाणात बेहिशेबी रोकड, शस्त्रास्त्रे, संशयास्पद कागदपत्रे, मोबाइल संच जप्त करण्यात आले.

## एटीएसच्या कार्यालयातून पळालेल्या बांगलादेशी नागरिकाला अटक



**■मुंबई। प्रतिनिधी,**

काळाचौकी येथील राज्य दहशतवाद विरोधी पथकाच्या कार्यालयातील शौचालयाच्या भिंतीवरून उडी मारून पळालेल्या बांगलादेशी नागरिकाला पुन्हा अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. भारतात बेकायदेशिररित्या राहत असल्याप्रकरणी आरोपीला महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने अटक केली होती. राज्य दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस हवालदार विशाल उत्तम भारस्कर (४१) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवला होता. एटीएसने फसवणुकीसह अवैध मागार्ने भारतात प्रवेश केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून अन्वर ऊर्फ शहादत उर्फ शाजू अबुल हाषिम शेख (२९) याला ८ डिसेंबर २०२२ रोजी अटक केली होती. ६ मार्च रोजी त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. सुनावणीदरम्यान आरोपीने गुन्हाही कबूल केला होता. त्याला २९ सप्टेंबर रोजी १० महिन्यांची शिक्षा आणि ५०० रुपये दंड ठोठावण्यात आला होता. निकालामध्ये आरोपीचे प्रत्यार्पण करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, प्रादेशिक परकीय नागरिक नोंदणी अधिकारी, तसेच पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-२, गु. अ. वि. मुंबई, कार्यालयाशी पत्र व्यवहार करण्यात आला होता. आरोपीने शिक्षा पूर्ण भोगल्यानंतर त्याला १ नोव्हेंबर रोजी एटीएसच्या काळाचौकी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते. तेथे तो पोलिसांच्या देखरेखीखाली खाली होता. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.४५ च्या सुमारास अंघोळीचे निमित्त करून तो प्रसाधनगृहात गेला. कपडे धुण्याचे निमित्त करून तो पुन्हा आतमध्ये गेला. आरोपी कपडे धूत असल्याने तक्रारदार दैनंदिन माहिती घेण्यासाठी मध्य प्रादेशिक विभाग, मुंबई व अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई येथील नियंत्रण कक्षातील रायटर यांना दूरध्वनी करण्यासाठी बाहेर गेले. त्यानंतर ७.३० ते ७.४५ च्या सुमारास आरोपी दिसत नसल्याने त्यांना संशय आला. त्यांनी प्रसाधनगृहात शोध घेतला. त्यावेळी आरोपी भिंतीवर चढून उडी मारून पसार झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. आरोपी पळून गेल्याने खळबळ उडाली. पोलीस पथकाने काळाचौकीसह कॉटन ग्रीन रेल्वे स्थानक, शिवडी रेल्वे स्थानक, सीएसएमटी रेल्वे स्थानक, लोकमान्य टिळक टर्मिनस व टिळक नगर रेल्वे स्थानक, वांद्रे रेल्वे टर्मिनस परिसरातील सीसी टीव्ही कॅमेऱ्यातील चित्रणाची तपासणी केली. अखेर आरोपी विक्रोळी परिसरात वास्तव्याला असल्याची माहिती दहशतवाद विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार सापळा रचून आरोपी शेखला पुन्हा अटक करण्यात पोलिसांना यश आले.




## लष्करभरतीचे आमिष दाखवून तरुणाची १७ लाखांची फसवणूक, ठाण्यात गुन्हा दाखल

**■ठाणे। प्रतिनिधी,**

भारतीय लष्करात भरती करण्याचे प्रलोभन दाखवून १७ लाखांची फसवणूक करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध ठाणेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गंभीर बाब म्हणजे, आरोपीने दोन उमेदवारांची ठाण्यातील हॉटेलमध्ये परीक्षा घेत लवकरच त्यांना प्रशिक्षणासाठी मध्य प्रदेश आणि कर्नाटकला पाठवणार असल्याचे भासवले. मात्र, आरोपीने त्यांना नोकरीला लावले नाही. अद्याप आरोपीला अटक झाली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. विरारमध्ये राहणाऱ्या एका डॉक्टरच्या ओळखीच्या व्यक्तीकडून डॉक्टरची आरोपीशी ओळख झाली. ४९ वर्षांचा आरोपी मुलुंड येथे वास्तव्य करत असून तो मूळचा ओदिशाचा आहे. आरोग्यविषयक वस्तूंच्या विक्रीचे काम करणाऱ्या आरोपीने भारतीय लष्करातून निवृत्त झाल्याची माहिती डॉक्टरला दिली होती. त्यानंतर नेहमीच कामानिमित्त डॉक्टर आणि आरोपीची भेट होत असल्याने आरोपीने डॉक्टरला तरुणांना भारतीय लष्करात भरती करण्याचे काम करत असल्याचे सांगितले होते. डॉक्टरच्या दिल्ली येथील ओळखीच्या व्यक्तीची मुलगी आणि तिचा चुलतभाऊ यांना लष्करात भरती व्हायचे असल्याने डॉक्टरने त्या व्यक्तीला आरोपीविषयी सांगितले.

काही दिवसांनी डॉक्टरची ठाण्यातील एका हॉटेलमध्ये आरोपीबरोबर भेट झाल्यानंतर आरोपीने भारतीय लष्करात भरती करण्याचे एका व्यक्तीचे नऊ लाख रुपये घेत असल्याचे सांगितले. ही बाब डॉक्टरने दिल्लीतील व्यक्तीला सांगितल्यानंतर त्याने त्याच्या मुलीच्या आणि पुतण्याच्या भरतीसाठी १८ लाख रुपये देण्याची तयारी दर्शवली. सुरुवातीला चार ते पाच लाख रुपये द्यावे लागतील. नंतर उमेदवारांची परीक्षा घेतली जाईल. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणासाठीला पाठवले जाईल, अशी माहिती आरोपींनी दिली होती. त्यानुसार दिल्लीच्या व्यक्तीने पाठवलेले एक लाख रुपये डॉक्टरने आरोपीला दिले. पैसे मिळाल्यानंतर आरोपीने दोन्ही उमेदवारांना दिल्लीवरून ठाण्यात परीक्षा देण्यासाठी बोलवले. २७ डिसेंबरला आरोपीने दोघांची ठाण्यातील एका हॉटेलमध्ये परीक्षा घेतली. नंतर ही मुले पुन्हा दिल्लीला निघून गेली. आरोपीने डॉक्टरकडे उर्वरित पैसे देण्याचा तगादा लावला. डॉक्टरने त्यांच्या दिल्लीतील ओळखीच्या व्यक्तीला ही गोष्ट सांगितल्यानंतर त्यांनी डॉक्टरच्या बँक खात्यात पैसे पाठवले. डॉक्टरने आरोपीला हे पैसे दिले. पैसे मिळाल्यानंतर दोन्ही मुले परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने लवकरच त्यांना मध्य प्रदेश आणि कर्नाटक येथे प्रशिक्षणाला पाठवावे लागेल, अन्यथा ही मुले बाद होतील, असे सांगितल्याने डॉक्टरने त्यांच्याकडील नऊ लाख रुपये आरोपीला दिले.

एकूण १७ लाख १० हजार रुपये उकळल्यानंतरही दोन्ही मुलांची लष्करात भरती झाली नाहीच, तसेच, आरोपी मुलुंड येथील घर सोडून निघून गेला. त्याचा मोबाइल फोन बंद असल्याने डॉक्टर, तसेच दिल्ली येथील त्यांच्या ओळखीचे व्यक्ती आणि अन्य असे मुंबईत सैन्य दलाच्या कार्यालयात जाऊन भरतीबाबत चौकशी केल्यानंतर कोणतीही प्रशिक्षणाची ऑर्डर काढली नसल्याचे त्यांना समजले. फसवणूक झाल्याचे कळताच डॉक्टरने दिलेल्या तक्रारीनंतर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला.

## परराज्यातून येणाऱ्या औषधांची तपासणी सुरू, अन्न आणि औषध प्रशासनाची मोहीम

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील बनावट औषध विक्रीला आळा घालण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाने (एफडीए) परराज्यातून मागविण्यात येणाऱ्या औषधांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार अन्न आणि औषध प्रशासनाने परराज्यातून येणाऱ्या औषधांची तपासणी सुरू केली असून, राज्यात येणाऱ्या प्रत्येक औषधाची माहिती घेण्यात येत आहे. देशामध्ये मोठ्या प्रमाणावर औषधांची निर्मिती करणारे उत्पादक हिमाचल प्रदेशमधील बद्दी परिसरात आहेत. त्याचबरोबर गुजरात व उत्तरांचलमध्ये मोठ्या प्रमाणात औषधांची निर्मिती केली जाते. त्यामुळे राज्यातील घाऊक आणि किरकोळ औषध विक्रेते मोठ्या प्रमाणात परराज्यातून औषधांची खरेदी करतात. या राज्यांतून येणारी अनेक औषधे प्रमाणित दर्जानुसार नसतात. त्यामुळे राज्यामध्ये बनावट व निकृष्ट दर्जाची औषधे मिळण्याची शक्यता आहे.

परराज्यातून मागविण्यात येणाऱ्या औषधांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाने सर्व वितरकांकडे त्यांनी मागविलेल्या औषधांचा तपशील ई-मेलद्वारे सादर करण्याचे आदेश दिले होते. प्रशासनाने विभागनिहाय ई-मेल आयडी तयार करून तपशीलांची तपासणी करण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार घाऊक आणि किरकोळ विक्रेत्यांनी खरेदी केलेल्या औषधांची सर्व विभागीय सहआयुक्त, सहायक आयुक्त व औषध निरीक्षकांद्वारे तपासणी करण्यात येत आहे. या तपासणीला वितरकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत आहे. वितरकांकडून आलेल्या माहितीचे काटेकोरपणे निरीक्षण व तपासणी करण्यात येत आहे.

आतापर्यंत केलेल्या तपासणीमध्ये बनावट औषधांचा तपशील सापडलेला नाही. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये ही कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिली.

# 6 वजन कमी करणारे आहार जे आम्हाला प्रयत्न करण्याचा मोह झाला



लठ्ठपणाच्या वाढत्या धोक्यात आणि आपल्या आरोग्यावर परिणाम करू शकर्णाया अनेक जुनाट आजारांच्या दरम्यान, फिटनेसच्या उद्दिष्टांसाठी काम करणे महत्त्वाचे आहे. नियमित व्यायामासोबतच, पोषण हे वजन कमी करण्यात आणि टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. तथापि, इष्टतम आरोग्य मिळविण्यासाठी, केवळ वजन कमी करण्यावरच लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे नाही तर संभाव्य हानिकारक आहार टाळता येईल आणि शाश्वत कल्याण सुनिश्चित होईल अशा प्रकारे संपर्क साधणे देखील महत्त्वाचे आहे. 2023 च्या वेलनेस ट्रेंडवरून असे सूचित होते की लोक शाश्वत वजन कमी करण्यासाठी दीर्घकालीन लक्ष केंद्रित करून खाण्याच्या पद्धतींना प्राधान्य देत आहेत. अत्यंत कमी-कॅलरी आहार, निवडक अन्न गटांवर लक्ष केंद्रित करणारे आहार किंवा ज्यांना खूप निर्बंध आहेत ते चित्राच्या बाहेर आहेत आणि निरोगीपणा उत्साही लोकांकडून नाकारले जात आहेत. अतिरिक्त फ्लॅब लवकर गमावण्यासाठी आहाराच्या टिप्ससाठी इंटरनेटवर सल्ल्याची कमतरता नाही. त्यातले बरेचदा नौटंकी ठरतात. काही आहार किलो जलद कमी करण्यास मदत करू शकतात परंतु दीर्घकाळात ते चयापचय कमी करतात. लक्षपूर्वक खाणे, अधूनमधून उपवास करणे, वनस्पती-आधारित आहार हे नवीन युगातील पर्याय आहेत जे त्यांच्या व्यावहारिक दृष्टिकोनासाठी लोकांच्या पसंतीस उतरत आहेत.

फिसिको डाएट आणि एस्थेटिक क्लिनिकच्या संस्थापक आहारतज्ञ विधि चावला यांनी 2023 मध्ये नवीन वयातील वजन कमी करण्याच्या आहाराच्या ट्रेंडचा शोध घेतला कारण त्यांनी केवळ वजन नियंत्रणातच नाही तर एकूण आरोग्यासाठी देखील मदत केली.

1. अधूनमधून उपवास :

ते काय आहेः अधूनमधून उपवासामध्ये खाणे आणि उपवास दरम्यान सायकल चालवणे समाविष्ट आहे. तुम्ही खाल्लेल्या विशिष्ट पदार्थांपेक्षा तुमच्या जेवणाची वेळ जास्त महत्त्वाची असते.

हे लोकप्रिय का आहेः अनेकांना लवचिक वेळापत्रकासह वजन कमी करण्यात आणि चयापचय सुधारण्यात यश मिळते. यामुळे एखाद्याला त्यांच्या आवडीनुसार अन्न खाणे देखील शक्य होते.

2. वनस्पती-आधारित आहारः

ते काय आहेः वनस्पती-आधारित आहाराचे पालन करणे म्हणजे फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, नट, बिया आणि शेंगा यांचे सेवन करणे आणि प्राणी उत्पादने कमी करणे किंवा काढून टाकणे. वनस्पती-आधारित आहार हृदयरोग, मधुमेह आणि विशिष्ट कर्करोगाच्या कमी जोखमींसह विविध आरोग्य फायद्यांशी संबंधित आहेत. ते फायबर, जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध असतात.

हे लोकप्रिय का आहेः वजन कमी करणे, वाढलेली ऊर्जा आणि जुनाट आजाराचा कमी धोका यासारखे आरोग्य फायदे आहार लोकप्रिय करत आहेत. ते पर्यावरणपूरकही आहे.

3. केटो 2.0 किंवा सुधारित केटोजेनिक आहार :

ते काय आहेः पारंपारिक केटोजेनिक आहारावर आधारित, हे सूत्र चरबी, प्रथिने आणि काबोर्हायड्रेट्सचा समावेश असलेल्या निरोगी आणि अधिक संतुलित आहारास अनुमती देते.

हे लोकप्रिय का आहेः केटो 2.0 हे केटोजेनिक जीवनशैली अंगीकारणे आणि टिकवून ठेवणे आणि दीर्घकालीन सुरक्षिततेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी डिझाइन केले आहे.

4. लक्षपूर्वक खाणेः

ते काय आहेः लक्षपूर्वक खाणे खाण्याकडे लक्ष देण्यास आणि अन्नाची चव आणि पोत घेण्यास प्रोत्साहित करते. आहार जेवणाच्या वेळेला विश्रांतीच्या क्षणात बदलण्यास आणि प्रत्येक चाव्याचा आस्वाद घेण्यास प्रोत्साहित करतो. जेव्हा तुम्ही तुमच्या अन्नाच्या तपशीलांवर लक्ष ठेवता, तेव्हा तुम्ही स्वाभाविकपणे अतिप्रसंग टाळता. सध्याच्या क्षणी राहून, तणावाची पातळी देखील नियंत्रणात आहे. तणाव कमी करणे, सावधपणे चघळणे आणि भाग नियंत्रित करणे दीर्घकाळापर्यंत वजन कमी करण्यास मदत करू शकते.

हे का लोकप्रिय आहेः लक्षपूर्वक खाणे वजन व्यवस्थापित करण्यात मदत करते आणि आहाराशी निरोगी संबंध वाढवून निरोगी खाण्याच्या सवयींना प्रोत्साहन देते.

5. तंत्रज्ञान सक्षम पोषण :

ते काय आहेः ॲप्स आणि वेअरेबल उपकरणे यांसारख्या तंत्रज्ञानाचे एकत्रिकरण आणि पोषणाचे निरीक्षण करण्यासाठी ते देखील तरुणांमध्ये नाराज होत आहे. हे फिटनेसवर लक्ष केंद्रित करण्यात आणि वजन कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रेरित करण्यात मदत करू शकते.

ते लोकप्रिय का आहेः तंत्रज्ञान अनुसरण करणे सोपे आहे आणि वैयक्तिकृत माहिती प्रदान करते, ज्यामुळे लोकांना त्यांचे वजन कमी करण्याच्या उद्दिष्टांचा मागोवा घेणे सोपे होते.

6. लवचिक जीवनशैलीः

ते काय आहेः आहार घेण्याचा एक लवचिक दृष्टीकोन जो बहुतेक वनस्पती-आधारित आहे आणि कधीकधी मांस आणि इतर प्राणी उत्पादने समाविष्ट करतो.

# कमाल कशिमरी कहवा

थंडी म्हणावी तशी सुरू झालेली नसली तरी रात्रीचा गारवा तिच्या येण्याची वर्दी घेऊन येऊ लागतो आणि गरमागरम पेयांची आठवण होते. चहा, कॉफी तर नित्याची पेयं, पण सर्व भारतीयांना अलीकडेच आपलासा वाटू लागलेला कश्मिरी कहवा म्हणजे कश्मीरइतपंच सुंदर आणि अनोखं पेय. भारतातील विविध राज्यांत चहा बनवण्याचे अगणित प्रकार आहेत. कश्मिरी मंडळी मात्र ग्रीन टीला आपली पसंती देतात. खास कश्मिरी मसाल्यांचा वापर करून बनवला जाणारा हा ग्रीन टी भारताबाहेरही लोकप्रिय आहे. कश्मीरच्या कडाक्याच्या थंडीत उबदारपणा आणणारा हा कहवा कश्मीरचं पारंपरिक पेय होय. पूर्वी कश्मीरला जाणारी मंडळीच कहव्याचे गुणगान गात. आता हा कहवा कश्मीरची सीमारेषा ओलांडून सार्वत्रिक झाला आहे केहवा, कहावा, कहवा, कावाङ्गनावं अनेक, पण पेय तेच. कॉफीसाठी वापरला जाणारा तुर्का शब्द. केहवामध्ये 'कहवा' शब्दाचं मूळ दडलेलं आहे असं म्हणतात, पण कश्मिरी मंडळींसाठी 'कहवा'चा अर्थ गोड चहा असा होतो. पूर्वी या चहाला 'मोगल चहा' म्हटलं जाई. त्यावरून कश्मिरी कहवा मोगलांनी आणला असावा अशी शक्यता संशोधक मांडतात. पण कुशाण राजवटीत मसाल्यांच्या वा रेशमाच्या मार्गानें (सिल्क रुट) कहवा भारतात आल्याची शक्यता अधिक आहे. मूळ कोठेही असो, आज कश्मिरी कहवा अफगाणिस्तान, पाकिस्तान, मध्यपूर्व देशांत चवीने प्यायला जातो. या भागातील हे पारंपरिक पेय आहे.

कहवा तयार करणं हा तामझामचा भाग आहे.

अगदी अस्सल कहवा समोवर नामक पितळी किटलीत तयार होतो. यातील भांडयांची रचना अशी असते की, खालच्या भागात कोळसे पेटवत ठेवता येतात आणि वर विशिष्ट पानांपासून तयार होणारा कहवा उकळत राहतो. कश्मिरी हवेचा सर्द मिजास लक्षात घेता साधारण चहाप्रमाणे एकदाच उकळून तो ओतेपर्यंत गार होण्याची शक्यता अधिक. त्यामुळे मंद कोळशांवर कहवा गरम राहतो. दालचिनी, वेलची, कश्मिरी गुलाबाच्या पाकळ्या हिरव्या चहापत्तीची खुमास वाढवतात. खास प्रसंगी, कुणी विशेष पाहुणे येणार असतील तर कहवात जगातील सर्वात महागडा मसाला अर्थात केशरही सामील होते. यातील केशर, दालचिनी, वेलची संपत्तीचं प्रतीक आहेत. शिवाय ते शुभसंकेताचेही मानले जाते. हा चहा मध किंवा साखरेसह दिला जातो. बदाम आणि अक्रोडचा चुराही काही वेळा यात शामील होतो. कहवात दुधाचा वापर क्वचितच होतो. ज्येष्ठ किंवा आजारी मंडळींना कहवा देताना दूध घातलं जातं. कहवातले घटक या चहाला शाही रूपडं देतात. कश्मिरी शाही दावत वाझवाननंतर कहवा पिणं ही कश्मिरी संस्कृती आहे. कहवाचे विविध प्रकार आहेत. शेंगरी कहवा विशेषकरून औषधी गुणधमार्साठी वापरला जातो. घसादुखी, सर्दी-खोकल्यावर उपाय म्हणून हा कहवा प्रसिद्ध आहे. पेशावरी कहवा हा खैबर पख्तुनख्वामध्ये आढळणारा कहवाचा प्रकार आहे . पारंपरिकपणे चमेलीचा चहा आणि हिरव्या वेलचीसह तो बनवला जातो. कश्मीरची ही खासीयत चहाच्या पॅफेमुळे जगभर पसरलीय. पारदर्शी किटलीतून हिरव्या पिवळसर रंगात, गुलाबाच्या पाकळ्यांची उधळण करत वेलची, दालचिनीच्या गंधासह जेव्हा तो आपल्या समोर दाखल होतो तेव्हा नुसत्या गंधाने तरतरीत वाटायला लावण्याची ताकद त्यात असते. कश्मिरी कहवाला 'वाह वाह' म्हणण्याचा मोह आवरत आपण त्या रंगगंधाच्या स्वर्गीयपणाला जहांगीरप्रमाणे "हमीन अस तोङ्घहमीन अस तो ङ्घहमीन अस तो" (जर कुठे स्वर्ग आहे, तर इथेच आहेङ्घ इथेच आहेङ्घ इथेच आहे!) असे म्हणत राहतो.



# मुळ्याच्या चवीने आणि वासाने नाक मुरडू नका; यकृताच्या आरोग्यासाठी फारच गुणकारी!

यकृताचे आरोग्य जपायचे असेल किंवा मेदयुक्त यकृताचे आरोग्य सुधारायचे असेल. तसेच कावीळ किंवा टायफॉइडसारख्या यकृताच्या आजारांतुन लवकर बरे व्हायचे असेल तर मुळा हा खात्रीशीर उपाय आहे. मुळ्यात व्हिटॅमिन सी समाविष्ट आहे. मुळा रस, सूप किंवा भाजी, कोशिंबिरीच्या रूपात सेवन केल्याने त्याचे गुणधर्म तणाव नियंत्रणासाठी हातभार लावतात. यकृत पेशींचे संरक्षण करण्यास आणि यकृत पेशींच्या पुनरुत्पादनास चालना देण्यास मुळा उपयुक्त ठरतो. मुळ्यात ग्लुकोसिनोलेट्स सारखी संयुगे असतात जी यकृताला त्याच्या नैसर्गिक डिटॉक्सिफिकेशन प्रक्रियेत मदत करू शकतात. हे संयुगे शरीरातील विषारी द्रव्यांचे विघटन आणि उच्चाटन करण्यास मदत करतात.

मुळा कॅलरी आणि चरबी कमी करण्यास मदत करतो, जे यकृताच्या आरोग्यासाठी महत्वाचे असल्याने वजन नियंत्रित राखण्यास मदत करतो. त्यामुळे जेवणात सॅलडमध्ये कच्चा मुळा, कोशिंबीर, पराठे अशा कोणत्याही स्वरूपात सेवन करा.मुळ्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे हायड्रेशन होते. रक्तप्रवाहातील विषारी द्रव्य शरीराबाहेर टाकली जातात. त्यामुळे यकृताचे आरोग्य सुधारते आणि ते हायड्रेटेड राहते.जीवनसत्त्वे, लोह आणि खनिजे यांसारखे आवश्यक पोषक घटक मुळा प्रदान करतो. शिवाय तो स्वस्तही मिळतो. निरोगी आयुष्यासाठी याहून स्वस्त आणि मस्त उपाय दुसरा आहे का सांगा? त्यामुळे नाक मुरडणे थांबवा आणि मुळ्याचे सेवन करा.


## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**

**मुख्य कार्यालय - विरार**

**दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३**

**जावक क्र. वविशम /कवि/२४६७/२०२३-२४**

**दिनांक -१३/१२/२०२३**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. क्र. | पावती | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तुळींज-3 | NL03/1179/51 | 4841 | साई सिध्दी इंटरप्राईजेस | मोहम्मद अकरम मोहम्मद हुसेन अंसारी |
| 2 | तुळींज-2 | NL02/700/90 | 4843 | एम के नागराज अर्जुन | सुलोचना बबन मंडलिक |
| 3 | तुळींज-2 | NL02/700/63 | 4845 | पुजा चेतन राठोड | एम. के. नागराज |
| 4 | तुळींज-2 | NL02/700/71 | 4847 | एम के नागराज अर्जुन | चंद्रशीला अमरजीत सिंह |
| 5 | तुळींज-2 | NL02/254/25 | 4850 | प्रमिला प्रभाकर गुरव | गणेशकुमार श्री उपेंद्र दास |
| 6 | तुळींज-2 | NL02/700/93 | 4851 | एम के नागराज अर्जुन | विलास जनार्दन खोकरे |
| 7 | तुळींज-2 | NL02/986/28 | 4854 | अखिलेश सिंह | मेहरुनिसा नजाकत अनसारी |
| 8 | तुळींज-2 | NL02/965/44 | 4856 | देवेंद्र खेमराज जैन | फिरोज आलम मोहम्मद तसलीम |
| 9 | तुळींज-2 | NL02/676/91 | 4857 | शिल्पा चंद्रकांत महाडिक | रजनी विनायक वाघमोडे |
| 10 | तुळींज-2 | NL02/550/44 | 4860 | अयुबलाल मो सिध्दिकी | अशरफ मो शफीक |
| 11 | तुळींज-1 | NL01/197/15 | 4862 | अनवर अहमद नसीमा बानो कुरेशी | शमीम अन्वर हजहारूल हक |
| 12 | तुळींज-2 | NL02/659/57 | 4864 | फैज मोहम्मद मुरादअली पलसानिया | साजिद हारून भोरपिनया |
| 13 | तुळींज-4 | NL04/228/25 | 4865 | लालजी तिवारी | शिल्पा प्रवीन्द्र मिश्रा |
| 14 | तुळींज-7 | NL07/527/29 | 4869 | प्रतिक्षा प्रदीप राणे | साक्षी संतोष परब |
| 15 | तुळींज-3 | NL03/1081/36 | 4872 | निरंजन गोवर्धनलाल बंसल | हरिशचन्द्र भगाने निषाद |
| 16 | तुळींज-4 | NL04/218/3/1 | 4874 | अनंत दत्ताराम चाळके | सोनु र/ड फुलचन्द्र व विनोद श्रीपत प्रजापती |
| 17 | तुळींज-4 | NL04/183/23 | 4875 | अंकुश देसाई | संजु राजकुमार गुप्ता |
| 18 | तुळींज-4 | NL04/153/8 | 4879 | स्नेहाचंद्र सु. जैसवार | रामविलास छागुर सरोज |
| 19 | तुळींज-4 | NL04/398/59 | 4881 | सुनिता प्रकाश शिंदे | योगिनी शरद जाधव |
| 20 | तुळींज-3 | NL03/947/74 | 4884 | पुनिता रामसहजिवन चौबे | गोदावरी बबन राजुरकर |

**सही /-**

**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**


## बोधकथा

# अस्वलाची शेपटी गेली कुठे?

ही गोष्ट आहे अगदी सुरुवातीच्या काळातली. ब्रह्मदेवाने नुकतेच सृष्टीला बनवले होते. हळू हळू पुथ्वीवर त्याने एक एक सजीवाची निर्मिती केली. वाघ, ससा, कासव, हरीण, बकरी, घोडा, गाढव, असे सगळेच प्राणी ब्रह्मदेवाने तयार केले. त्यांच्यासाठी अण्णा आणि पाण्याची व्यवस्था केली. मात्र आज जसे आपल्याला हे प्राणी पाहायला मिळतात तसे ते तेव्हा नव्हतेच. ब्रह्मदेवाने कोणत्याच प्राण्याला शेपटी दिली नव्हती. सुरुवातीला तर कोणत्याच प्राण्याला काही त्रास झाला नाही. पण मग हळू हळू सर्वांना शेपटीसारखा अवयव नसण्याचे तोटे जाणवू लागले. सगळ्यांना काहींना काही कारणासाठी शेपटी आवश्यक वाटायला लागली. काही प्राण्यांना माश्यांपासून संरक्षण म्हणून शेपटी हवी होत. तर खारू सारख्या प्राण्यांना आपण अधिक सुंदर दिसावे म्हणून शेपटी हवी होती. आपले झाडावरचे जीवन अधिक सुरक्षित होण्यासाठी माकडांना शेपटी हवी होती. शेपटीची गरज तर सर्वांनाच होती म्हणून मग सर्वांनी एक दिवस मिळून ब्रह्मदेवाला प्रार्थना केली. ब्रह्मदेव प्रकट झाले तेव्हा साऱ्यांनी आपापले गाऱ्हाणे त्यांच्यासमोर मांडले. ब्रह्मदेवाने सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि एक दिवस ठरवून सर्वाना शेपट्या देण्याचा कार्यक्रम घेण्याचे ठरवले. ब्रह्मदेवाचा निर्णय ऐकून सगळे अतिशय खुश झाले. आपले सगळे कष्ट संपतील, या घोंघावणाऱ्या माश्यांपासून सुटका मिळेल या भावनेने सगळ्यांची मने उल्हसित झाली. तो दिवस त्यांनी एखाद्या सणाप्रमाणे साजरा केला. आता त्यांना प्रतीक्षा होती ती ब्रह्मदेवाने ठरवून दिलेल्या दिवसाची. शेवटी तो दिवस उजाडला. त्या दिवशी सकाळीच सर्वांनी छान तयारी केली आणि ब्रह्मदेवाने ठरवून दिलेल्या ठिकाणी पोहचले. ब्रह्मदेवाने आधीच एक मोठा वाडा सर्वांसाठी तयार करून ठेवला होता. त्या वाड्याला चारही बाजूंनी आरसे होते. आणि मधोमध वेगवेगळ्या शेपट्या ठेवल्या होत्या. त्यादिवशी एकीकडे सगळे त्या महालात जाऊन आपल्याला शोभेल ती शेपटी घेऊन येत होते. तर दुसरीकडे अस्वल मात्र चांगलेच घोरत पडले होते. त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला पण अस्वल काही उठत नव्हते. पाच मिनिट थांब, दहा मिनिट थांब असे करत अस्वल पुन्हा लोळण घेत होते. असे करता करता दुअप्र झाली. दुपारी नव्याने भेटलेली झुबकेदार शेपटी मिरवत जेव्हा घोडा अस्वलापाशी आला तेव्हा त्याच्या शेपटीला पाहून अस्वलाची झोपच उडाली. त्याने लगेच तयारी केली. मोठ्या उत्साहाने तो महालात पोहचला. पण तेथे त्याचा पूर्ण हिरमोद्ध झाला. आत गेला तर तेथे एकही शेपटी नव्हती. तो लगेच ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवाने त्याला एवढा उशीर का झाला त्याबद्दल विचारले. त्याच्याकडून पूर्ण सत्य जाणून घेऊन ब्रह्मदेवाने त्याला बिना शेपटीने राहणे हेच त्याचे भाग्य असल्याचे सांगितले. आणि ब्रह्मदेव अद्दश्य झाले. तेव्हापासून अस्वल बिना शेपटीने जगत आहे.

**तात्पर्य – आळस हा माणसाचा शत्रू आहे. कधीही आळस करू नये..**



## संपादकीय...

# सरकारने केला कांद्याचा वांदा!



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

आधीच आसमानी संकटाने बेजार झालेला कांदा उत्पादक शेतकरी आता कांदा निर्यात बंदीच्या निर्णयामुळे हतबल झाला आहे. केंद्र सरकारने स्थानिक बाजारपेठांतील कांद्याचे दर नियंत्रणात आणण्यासाठी पुन्हा निर्यात बंदीचे हत्यार बाहेर काढले. त्यासाठी लाल कांदा बाजारात येण्याची वाटदेखील बघण्यात आली नाही. केंद्राच्या निर्णयामुळे कांद्याच्या दरात ९०० ते हजार रुपयांची घसरण झाली आहे. त्यामुळे राज्यभरातील कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक झाले आहेत. सरकारच्या निर्णयाला विरोध करत शुक्रवारी राज्यातील बहुतांश बाजार समित्यांमध्ये कांद्याचे लिलाव झालेच नाहीत. केंद्र शासनाने लाल कांदा येण्याची वाट न बघता कांदा निर्यात बंदीचा निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. खरेतर अलीकडेच अवकाळी पाऊस व गारपिटीत नवीन लाल कांद्याचे मोठे नुकसान झाले. जवळपास १२ हजार हेक्टरवरील कांदा खराब झाला. त्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यामुळे नवीन लाल कांदा बाजारात येत असतानाही दरात फारशी घसरण झाली नाही.

उलट पुढील काळात ते आणखी वाढण्याची शक्यता होती. म्हणजेच नुकसानीच्या काळात सरकार पाठीशी उभे राहिलेच नाही, पण जेव्हा दोन पैसे कमावण्याची वेळ आली तेव्हा मात्र निर्यात बंदी लादून थोड्याफार नफ्यावरही पाणी फिरवले.आता पुढच्या महिन्यात नवीन कांदा येण्यास सुरुवात होईल आणि आताच भाव पडल्यामुळे या नव्या कांद्याला भाव मिळण्याची शक्यता नाही. म्हणजे नुकसान हे आता पाचवीला पुजले गेले आहे. त्यामुळे आता काय करायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. कांदा निर्यात बंदीमागे पाच राज्यांतील निवडणुकांनाही जबाबदार धरले जाते. केंद्र सरकारने राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आणि मिझोराम राज्यांच्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून कांद्यावर ८०० डॉलर निर्यात मूल्य केले होते. तसेच केंद्र सरकारच्या वतीने नाफेड, एनसीसीएफमार्फत खरेदी केलेल्या कांद्याच्या बफर स्टॉकमधून २ लाख टन कांदा २५ रुपये किलोने विक्री केला. या निर्णयामुळे तीन राज्यांमध्ये आपली सरकारे आल्याचा गैरसमज भाजपचा झाला आहे. यामुळे आता लोकसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून पुन्हा एकदा कांदा शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फिरवण्याचा उद्योग सरकारने केला आहे.

अर्थात कांद्याच्या बाबतीतील भारतीय जनता पक्षाच्या गाठीशी असलेला अनुभव कटू आहे. या पक्षाला १९९८च्या निवडणुकीमध्ये कांद्याचे दर भडकल्याने काही राज्यांत सत्ता गमवावी लागली होती. तेव्हापासून भाजपने कांद्याची धास्ती घेतली असावी. सत्तेत आल्यानंतर २०१४ मध्ये मोदींनी कांद्याचा अत्यावश्यक वस्तूंच्या यादीमध्ये समावेश केला, मात्र शेतकरीविरोधी निर्णय घेतले तरी त्याचा निवडणुकीमध्ये फटका बसत नसल्याचा भाजपचा अलीकडील काळातील अनुभव आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य ग्राहकांना खूश करण्यासाठी शेतकऱ्यांचा बळी दिला जात असल्याचे दिसते. महाराष्ट्र हे कांदा पिकवणारे अग्रणी राज्य आहे. भाव पडले की त्याचे खापर शेतकरी राज्य सरकारवर फोडतो आणि सरकारच्या विरोधात जनमत आपोआप तयार होते. विरोधकांचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण करण्यासाठी कांदा हे प्रभावी अस्त्र असल्याचे यापूर्वीदेखील स्पष्ट झाले आहे. खरेतर निर्यात बंदीला ग्राहक हिताची झालर लावली जात असल्याने हा मुद्दा सर्वसामान्य गांभीर्याने घेत नाहीत. कांदा दर नियंत्रणासाठी शक्य तेथून आयात करणे आणि निर्यातीवर थेट निर्बंध लावणे हे पारंपरिक उपाय सरकारने करून पाहिले, परंतु या दोन्ही निर्णयांचा कांदा दरावर काहीही परिणाम झालेला दिसला नाही. योग्य भाव न मिळाल्याने साठवलेल्या हजारो टन कांद्याचे शेतकऱ्यांना मागील वर्षी खत करावे लागले होते, हे सरकार विसरलेले दिसते.

# अमृतकाळातही भ्रष्टाचारी मोकाट कसे ?

भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड आहे. ती ठेचली पाहिजे. असे सर्वच राजकीय पक्ष म्हणत असतात. ही घासून गुळगुळीत झालेली टेप ऐकून लोकांना वैताग आला आहे. भ्रष्टाचार करणारेच प्रिय आहेत असा संदेश यापूर्वी वेळोवेळी देशात पोहोचत राहिला आहे. त्यामुळे प्रामाणिक लोकांनी कोणाकडे पाहायचे हा प्रश्न आहे?

महागाईच्या दिवसांत कुटुंबातील मंडळींचे पोषण करण्यासाठी सामान्य माणूस अथक मेहनत करत आहे. मुलांचे शिक्षण, वैयक्तिक अथवा कुटुंबातील सदस्यांचे आजारपण. यांवर होणारा खर्च कमी होण्याऐवजी वाढत असतो. या सर्व उलाढालीत अवतीभवती काय चालू आहे? याकडे लक्ष देण्यास लोकांना वेळ नाही. जीव जगवण्यासाठी राबत राहणे हेच जीवनाचे ध्येय झाले आहे. त्याप्रमाणे वागणे चालू आहे, असे वाटते. मात्र भ्रष्टाचार करणाऱ्या भ्रष्ट लोकांची तर चंगळच असते असे म्हणावे लागेल.

आधी साधी सेकंडहँड सायकल घेण्याची पात्रता नसणारा माणूस लोकप्रतिनिधी झाल्यावर लाखो-करोडो रुपयांच्या गाड्यांतून फिरू लागतो. अशी कोणती मेहनत त्याने केलेली असते? हे काही कळत नाही. पाच वर्षांत ज्या वेगाने आर्थिक घोडदौड होते ती तर डोळे विस्फारणारी असते. यांना जे मासिक वेतन मिळते त्यात तर मोठी आर्थिक झेप घेणे अशक्य आहे. मग ही झेप की झडप कशावर टाकली जाते? की जिथे यांना खजिनाच मिळतो आणि ते मालामाल होतात? झटपट मालामाल होण्याचा हा फॉम्युर्ला गुपितच ठेवला जातो. जनाची नाही मनाची नाही तर कसलीच लाज न बाळगता भ्रष्टाचार करणारे ताठ मानेने समाजात फिरू तरी कसे शकतात ? सामान्य माणसाने बँकेतून रीतसर कर्ज घेतलेले असले तरी ते फेडून पूर्ण होइपर्यंत त्याला चैन पडत नाही. आपण कोणाचे तरी देणे लागतो ही जाणीव त्याला कायम बेचैन करत असते. भ्रष्टाचारी माणसाला केवळ लुबाडणेच ठाऊक असल्याने देण्याचा आणि त्याचा विचार करण्याचा प्रश्नच नसतो. मेहनत न घेता सर्व मलाच मिळावे आणि विलासी जीवन जगावे हेच त्याला पक्के ज्ञात असते.

अर्थात दुसरीकडे हेही दिसते की, विकासाची नवनवीन स्वप्ने दाखवून विनाविलंब ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी काय करता येईल, याचा अभ्यास करून चोख नियोजन केले जाते आणि पुढे मग थाटामाटात याचे उद्घाटन सोहळे पार पडतात. असे करत विकासाच्या दिशेने वाटचाल ठेवली जाते आणि त्याला कुठे अटकाव होणार नाही याची काळजी घेतली जाते. असे आहे तर मग भ्रष्टाचार निर्मुलन गांभीयार्ने का घेतले जात नाही? अवकाशझेप घेणारा, सूर्य-चंद्र यांच्या दिशेने झेपावणारा भारत भ्रष्टाचार आणि भ्रष्टाचार करणारे यांच्यावर कारवाई करण्यात पुष्कळ मागे आहे, असे चित्र आहे, ते का?

### भ्रष्टाचारीच शक्तिशाली होतात...

भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांचा भक्कम राजकीय आधार होणे जोपर्यंत पूर्णतः थांबत नाही तोपर्यंत भ्रष्टाचार करणारे ताठ मानेने फिरतच राहाणार. तुमच्यामुळे कोणाचेही अडत नाही आणि अडणार नाही. उलट तुम्हीच कधीही तुमच्यावर असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांखाली कधीही अडकू शकता. हा संदेश भ्रष्टाचाराने बरबटलेल्या भ्रष्ट मंडळींपर्यंत गेला पाहिजे. पण यात सोयीस्कर खेळी नसावी. स्थानिक स्वराज्य संस्था-लोकसभा-विधानसभा यांच्या निवडणुका घोषित झाल्यावर इतरांप्रमाणे आपणही सुरक्षित पैलतीर गाठू शकतो हा फाजील आत्मविश्वास भ्रष्टाचारी मंडळींचे बलस्थान आहे. असे वाटते. आज जरी वातावरण आपल्याला अनुकूल असे नसले तरी निवडणुका घोषित झाल्यावर प्रतिकूल वातावरण आपसूकच अनुकूल होईल आणि सर्वकाही आपल्याला अनुकूल असेच घडेल अशी स्वप्ने पाहत घुडघ्याला बाशिंग बांधून असणारे कित्येक जण असतील. हा आत्मविश्वास यांच्यात कोणामुळे आला? याचे उत्तर जनतेला ज्ञात आहे.

आधी भ्रष्टाचारी म्हणून आरोप करायचे. मग पहाटेचे शपथविधी काय आणि मग ते फिसकटल्यावर काही कालावधीने पुढे सत्तेत बसण्याचा मान काय. अहो, लोकांच्या तोंडाला किती पाने पुसणार? लोकसेवा करण्यासाठी राजकारणात आहात की लोकांना असलेला त्रास कमी म्हणून त्यात भर टाकत राहून राजकीय चिखल करण्यासाठी राजकारणात आहात. नक्की स्वतःची उपयुक्तता तरी काय?

'तुम्ही तुमच्या कारकिर्दीत अमुक यांना जवळ केले मग आम्ही जर अमुक यांना जवळ केले तर का झोंबते?' असले वाक्यांचे शेलके खेळ बिनकामाचे आहेत. याने भ्रष्टाचाराचे निर्मुलन होणार नाही. तर भ्रष्टाचार करणारे अधिक शक्तिशाली होतील. यांना शक्तिहीन



झालेले जनतेला पाहायचे आहे. पुन्हा मंत्री म्हणून भ्रष्टाचार करणाऱ्या नेत्यांना लोकांवर लादने म्हणजे प्रामाणिकपणाचा गळा घोटणे होय. अशी निर्दय कामे करून लोकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे दुष्कर्म करणे लांछनास्पद आहे.

### 'ईडी' तरी किती स्वच्छ?

ईडीच्या अंकित तिवारी या अधिकऱ्याला २० लाख रुपयांची खंडणी घेताना तमिळनाडू पोलिसांनी ताब्यात घेणे त्या संस्थेच्या कार्यपद्धतीवर कैक प्रश्न निर्माण करते. असे किती भ्रष्ट अधिकारी त्या संस्थेत असतील? आणि त्यांनी आतापर्यंत किती जणांकडून पैसे गोळा करण्याचे म्हणजे भ्रष्टाचार करण्याचे काम केले असेल? हे समोर आले पाहिजे. लोकांना याची उत्सुकता आहे. सुरक्षित पैलतीर गाठण्यासाठी ईडी नावाच्या नौकेचा उपयोग झाला. मात्र तिचा एक नावाडीच लाचखोर आहे. हे जगजाहीर झाले आहे. त्यामुळे या संस्थेची पूर्ती बदनामी तर झालीच. पण यांनी आधी केलेल्या कारवाया कशा केल्या असतील? याविषयी दाट संशय आहे. कुंपणच शेत खात आहे. त्यामुळेच भ्रष्टाचार करणारे मोकाट आहेत असे समजायचे का? म्हणजे त्यांना ईडीचे भयच राहिलेले नाही. विरोधक या संस्थेच्या नावे आधीपासूनच बोंबा मारत आहेत. त्या सत्यच म्हणाव्या लागतील.

अमृतकाळात तरी हे थांबेल असे कुठेतरी वाटत होते. पण कसले काय? इकडचे भ्रष्टाचारी तिकडे जाऊन निवांत विश्रांती घेत चिंतामुक्त जीवनाचा मनमुराद आस्वाद घेत आहेत. राजकीय गणिते जुळवण्यासाठी विरोधकांवर कशाप्रकारे कुरघोड्या केल्या जाऊ शकतात हे दाखवण्यासाठी भ्रष्टाचारी नेत्यांना पायघड्या घालून त्यांच्या समोर माना तुकवणारे कधीतरी लोकांना स्वच्छ कारभार करणारे प्रामाणिक लोकप्रतिनिधी मिळवून देऊ शकतील का? हा सामान्य जनतेचा रोकडा प्रश्न आहे. आधीच्या सत्ताधारी मंडळींनी काय केले? त्यामुळे कारभाराचा गाडा हाकण्यासाठी नाईलाजाने जनतेत नाराजी असलेल्या लोकप्रतिनिधींनाही आपलेसे करावे लागणे. इतकी कोणती नामुष्की आली होती का?

# आदिवासींच्या आयुष्यात आरोग्यसेवेची पहाट



**आदिवासी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्यसुविधा प्रभावीपणे पोचवण्यासाठी व्यवस्थात्मक आणि धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. त्याचे चांगले परिणाम दिसत आहेत. 'जेव्हा आपल्या आदिवासी समाजाची भरभराट होईल तेव्हाच भारताची भरभराट होईल. आदिवासी समाजाच्या कल्याणाला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.'**

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शक तत्त्वज्ञानाचे अनुसरण करत आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी दाखवलेल्या अंत्योदयाच्या मागार्ला स्मरत भारत सरकारचे मार्गक्रमण सुरू आहे. समाजाच्या सर्व घटकांपर्यंत, विशेषतः सर्वात उपेक्षित आणि असुरक्षित समुदायांपर्यंत विकासाचे फायदे पोचवणे ही सरकारची मूलभूत बांधिलकी आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री मनसुख मांडवीय यांच्या नेतृत्वाखाली, समाजाच्या सर्व घटकांपर्यंत, विशेषतः आदिवासी समाजातील प्रत्येक वर्गापर्यंत आरोग्य सेवा पोचते की नाही याची खातरजमा करण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने यथायोग्य काळजी घेतली आहे.

राष्ट्रीय आरोग्य मोहिमेने (नॅशनल हेल्थ मिशन-एनएचएम) सुरुवातीपासूनच सर्वांना समान, परवडणाऱ्या दरात, खात्रीलायक आणि परिणामकारक आरोग्य सेवा देण्यास प्राधान्य दिले आहे. आदिवासी भागांसह इतर भागातील असुरक्षित समाजघटकांपर्यत आरोग्यसेवा पोचतील याची काळजी घेतली जात आहे. त्या-त्या भागातील स्थानिक गरजांनुसार, राज्यांना विविध स्तरावर विविध भागांमध्ये आरोग्यसेवा देता याव्यात या दृष्टीने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेने आरोग्य नियोजनाच्या विकेंद्रीकरणावर लक्ष केंद्रित केले आहे. राष्ट्रीय आरोग्य धोरण-२०१७ ने आदिवासी आणि सामाजिकदृष्ट्या असुरक्षित लोकांच्या विशेष आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन, या भागांत आरोग्यसेवांची तरतूद करत, त्यांच्या वितरणासाठी विशिष्ट उपाययोजनांची शिफारस केली आहे. आदिवासी मूल्य प्रणाली, परंपरा, सामाजिक-आर्थिक स्थिती यांच्या अनुषंगाने आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी केंद्रीय आदिवासी विकास तसेच शेतकरी कल्याण मंत्री अर्जुन मुंडा यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय बांधिल आहे.

आयुष्मान आरोग्य मंदिर – आरोग्य व्यवस्थेंतर्गत येणाऱ्या सर्व क्षेत्रांतील कार्यवाहीची रचना, केवळ सर्वांपर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठीच नाही तर आदिवासी भागातील सेवा वितरणाला प्राधान्य देण्यासाठी, ते प्रभावीपणे होण्यासाठी केलेली आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधांची सुरुवात करण्यासाठी नियम शिथिल करणे, प्रत्येक वस्तीवर आशा कर्मचारी नियुक्ती करणे या दिशेने काही पावले उचलली आहेत.

आयुष्मान आरोग्य मंदिर (एएएम) हा प्रमुख उपक्रम २०१८ मध्ये छत्तीसगडमधील जंगला या आदिवासी भागात (ब्लॉक-गट) सुरू करण्यात आला. आता या उपक्रमाने देशभरातील ग्रामीण आणि आदिवासी भाग व्यापला असून, १.६३ लाख आयुष्मान आरोग्य मंदिरे सध्या कार्यरत आहेत. वस्तीजवळच सर्वंकष प्राथमिक आरोग्य सुविधा देता यावी अशा प्रकारे या केंद्रांची रचना केली आहे. तर आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आर्थिक संरक्षणाची (मदत) हमी देत, दुय्यम व तृतीय श्रेणी सेवादेखील सर्वांना परवडण्याजोग्या बनवल्या जात आहेत; ज्यात अदिम आदिवासी गट लाभार्थी म्हणून पात्र ठरवले आहेत. राज्याच्या सरासरीपेक्षा कमी सर्वसाधारण आरोग्य निदेर्शांक असलेले सर्व आदिवासीबहुल जिल्हे, उच्च प्राधान्य जिल्हे (हाय प्रायोरिटी डिस्ट्रिक्ट्स-एचपीडी) म्हणून निश्चित केले असून, त्यांना राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत दरडोई वाढीव साधनसामुग्री मिळते. यामुळे, आदिवासी समुहातील विविध वर्गांना भेडसावणाऱ्या आरोग्यसेवाविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी नवनवीन पद्धती उपयोगात आणण्याकरता, राज्ये/जिल्ह्यांना नवनवीन कल्पना राबवता येतात. विविध उपक्रम – राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत केलेल्या तरतुदींद्वारे आरोग्यसेवेची उपलब्धता अधिक सुलभ झाली आहे. या तरतुदींनुसार, फिरती वैद्यकीय सुविधा पथके (मोबाईल मेडिकल युनिट्स-एमएमयू) तैनात करता येतात किंवा कमी लोकसंख्येच्या भागातही राष्ट्रीय रुग्णवाहिका सेवा पुरवता येऊ शकते. या क्षेत्रांतील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी, करारान्वये कंत्राटी तत्त्वावर विशिष्ट सेवा घेणे व देणे, 'तुम्ही सांगा, आम्ही पूर्तता करतो' या तत्त्वानुसार मोबदल्याबाबत वाटाघाटी, दुर्गम भागातील सेवेसाठी विशेष भत्ते आणि आरोग्य सेवेत कारकिर्द घडवण्यासाठी प्रगतीच्या नवनव्या संधी खुल्या करणे यासारख्या तरतुदींची हमी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिली आहे. आदिवासी भागातील आरोग्यसेवांना प्राधान्यासाठी आणि त्यांच्या नियोजनासाठी, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण, तसेच आदिवासी व्यवहार या दोन्ही विभागांनी परस्पर सहकार्याने आदिवासी आरोग्य कक्ष स्थापला आहे. तो आदिवासी भागातील आरोग्य सेवांच्या विविध क्षेत्रांमध्ये एकमेकांच्या सहयोगाने कार्यवाही करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करतो. विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांमध्ये आदिवासी भागांचा समावेश आहे की नाही याच्या खात्रीसाठी समुदाय स्तरावर उपक्रम राबवणे ही महत्त्वाची बाब आहे.

जागरूकता निर्माण करणे, आयुष्मान भारत आरोग्य खाते क्रमांक तयार करणे, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवा उपक्रम आणि त्वरीत रोगनिदानासाठी शारीरिक तपासणी, मूलभूत आरोग्यनिगा सेवा व दूरसंचार सेवेद्वारे वैद्यकीय सल्ला पुरवणे अशा उद्देशाने राष्ट्रीय आरोग्य मोहिमेंतर्गत गट आरोग्य मेळाव्यांसारखे समुदाय स्तरावरील उपक्रम हाती घेतले आहेत. आदिवासी आरोग्य विभागाच्या पुरेशा सहभागासह गट आरोग्य मेळावे घेताना सरकारच्या आंतरविभागीय समन्वयाला प्राधान्य दिले जाते. यामुळे संपूर्ण आदिवासी समाजापर्यंत सुविधा पोचून, सर्व सेवांचा लाभ त्यांना देणे शक्य झाले आहे. आयुष्मान भव अभियान आणि विकसित भारत संकल्प यात्रा यांसारख्या मोठ्या प्रमाणावरील समुदाय-आधारीत मोहिमांनी, अत्यावश्यक आरोग्य सेवांपासून कुणीही वंचित राहणार नाही, यासाठी सरकारच्या प्रयत्नांमध्ये भर घातली आहे.

देशभर आरोग्य सेवेच्या उपलब्धतेची सुलभता आणिव सर्वसमावेशकता यांची पद्धत पुन्हा नव्या चांगल्या प्रकारे कार्यान्वित करणे आणि त्यात संपूर्ण समाजाला सामावून घेणारा दृष्टिकोन यामधून प्रतीत करणे हे मोहिमांचे उद्दिष्ट आहे. नागरिकांना सरकारच्या योजनांची माहिती देवून त्यांचा लाभ देणे, जनजागृती व कल्याणकारी उपक्रमांचे लाभ थेट लोकांना पोचवण्यावर भर आहे. तसेच विकसित भारत संकल्प यात्रेची एकंदर रचना आणि आराखडा तयार केला आहे. अशा प्रकारे आदिवासी समाजावर लक्ष केंद्रीत करून समुदाय स्तरावर सेवांचा लाभ वाढवणे विकसित भारत संकल्प यात्रेद्वारे शक्य होत आहे. आदिवासी भागांमध्ये रोग निवारणासाठी राबवलेल्या उपक्रमांमध्ये, भारत सरकारने सिकलसेल ऍनिमिया निर्मूलन मोहीम ही राष्ट्रीय आरोग्य मोहिमेचा भाग केली आहे. त्याचा उद्देश सर्वांना परवडणाऱ्या दरात, सहज आरोग्यसेवा देणे हा आहे.

जनजागृती आणि समुपदेशन संबंधित उपक्रम, आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या सहकार्याने हाती घेतले आहेत. सरकारने अलीकडेच आरोग्य आणि पोषण यासह नऊ मंत्रालयांच्या माध्यमातून अकरा महत्वाचे उपक्रम राबवण्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपयांच्या तरतुदींसह प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान ढट-खअठटअठ सुरू केले आहे. सध्याच्या धोरणात्मक सुधारणांसह सरकारने आदिवासी आरोग्य हे अग्रक्रमाचे क्षेत्र निश्चित केले आहे. यामुळे प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत परवडणाऱ्या दरात आणि योग्य, समान दजार्ची आरोग्यसेवा उपलब्ध होत आहे. धोरणे आणि उपक्रमांची संपूर्ण मालिका यांच्या द्वारे आदिवासींना द्यायच्या आरोग्य सेवेमध्ये व्यवस्थात्मक सुधारणांना केंद्रस्थानी ठेवले आहे.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १९ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२३


# घरफोडी मधील सराईत गुन्हेगारास मोठ्या शिताफीने अटक करून सुमारे 806000 किमतीचा ऐवज पोलिसांनी केला हस्तगत





**■मिरारोड। प्रतिनिधी,**

फियार्दी श्री. वैभव गोपाळ आव्हाड वय-३२ वर्षे, धंदा-नोकरी रा- प्लेझंटपार्क, काशिमिरा, मिरारोड- पुर्व, ठाणे यांनी पोलीस ठाणेस येवून कळविले की, फियार्दी हे त्यांचा कुटुंबासोबत दि.०८/१२/२०२३ रोजी सायं-१६.०० वा चे सुमारास गोराई बीच येथे फिरण्यासाठी गेले होते. त्यानंतर रात्री-१९.४५ वा चे सुमारास फियार्दी व त्याचे कुटुंब गोराई येथे फिरून परत घरी आले तेव्हा त्यांना त्यांचा घराचे मुख्य दरवाजाचे कडी कोयंडा तुटलेले दिसले तसेच दरवाजास लावलेले लॉक देखील मिळुन आले नाही. तेव्हा फियार्दी यानी घरामध्ये जावुन पाहीले असता त्यांना बेडरुममध्ये असलेल्या तिजोरीचे लॉक तुटलेले व दरवाजा अर्धवट उघडा दिसला व कपाटातील सामान देखील आस्ताव्यस्त पडलेले दिसुन आले. त्यानंतर त्यांनी तिजोरीतील त्याचे सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच इतर मालमत्ता मिळुन रुपये- ८,०६,०००/- किंमतीची मालमत्ता मिळुन आली नाही. यावरुन त्यांची खात्री झाली की, त्यांचा घरामध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केली असुन त्याबाबत त्यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने काशिमिरा पोलीस ठाणे गु.र.क्र-८०८/२०२३ कलम-४५४,४५७,३८०,३४ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरचा गुन्हा घरफोडी चोरीचा व गंभीर स्वरुपाचा असल्याने मा.वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे तात्काळ तपास सुरु केला असता, तपासादरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवून घटनास्थळ तसेच घटनास्थळाच्या आजुबाजुचे सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासले असता त्यामध्ये एक संशईत इसम हा घटनास्थळावर येताना व जाताना दिसुन आला. सदर फुटेजच्या आधारे नमुद गुन्हयाचा तपास सुरु करुन तसेच पोलीस ठाणे अभिलेखावरील घरफोडी चोरी करणारे आरोपी यांचे फोटो तपासले असता त्यामध्ये घटनास्थवरील फुटेज हे रेकॉर्डवरील आरोपी नामे शमीम मोहम्मद हारुन शहा वय-२३ वर्षे रा-मुन्शी कंपाउंड, काशिमिरा, मिरारोड-पुर्व, ठाणे याचेशी मिळते जुळते असल्याचे आढळून आले.

त्यानुसार सदर आरोपी याचा पालीस ठाणे हददीत शोध घेतला असता त्यास मुन्शी कंपाउंड येथून ताब्यात त्याचाकडे तपास केला असता त्याने सदर गुन्हयात त्याचा सहभाग निष्पन्न झाला तसेच त्याचेकडे अधिक तपास केला असता सदर गुन्हात त्याचा भाऊ नामे सलीम मोहम्मद हारुन शहा वय-२५ वर्ष याचाकडे व त्याने त्यांची आई सैदुनिसा मोहम्मद हारुण शहा वय-५० वर्ष यांचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने आरोपी १) शमीम मोहम्मद हारुन शहा, २) सलीम मोहम्मद हारुन शहा ३) सेदुनिसा मोहम्मद हारुण शहा यांचा सहभाग असल्याचे आढळून आल्याने सदर आरोपीस गुन्हयात दि.१०/१२/२०२३ रोजी व दि.१२/१२/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपी यांची दि.१५/१२/२०२३ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर असून तपास चालू आहे. तपासा दरम्यान सदर आरोपी यांचेकडून नमुद गुन्हयातील चोरी गेलेली संपुर्ण मालमत्ता रुपये- ८,०६,०००/-किमतीचे सोने, चांदीचे दागीने व १०००/रु.रोख अशी सर्व मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. सदर गुन्हयात अटक केलेला आरोपी नामे शमीम मोहम्मद हारुन शहा वय-२३ वर्षे हा सराईत गुन्हेगार असून त्यांचेवर काशिमिरा पोलीस ठाणे येथे चोरीचे ०३ गुन्हे दाखल आहेत नमुद गुन्हयाचा तपास सपोनि/योगेश काळे करीत आहेत.

अटक आरोपी शमीम मोहम्मद हारुन शहा यांचा गुन्हे अभिलेख खालील प्रमाणे.

| गु.रजि.नं व कलम | पोलीस ठाणे |
|---|---|
| 1 २४८/२०२३ कलम ४५४,४५७,३८० भादविसं. | काशिमिरा पोलीस ठाणे |
| 1 ६५९/२०२३ कलम ४५४, ४५७, ३८०,३४ भादविसं. | काशिमिरा पोलीस ठाणे |

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे-पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे, श्री.समीर शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, सहा.फौ.अनिल पवार, पो. हवा. दिपक वारे, प्रताप पाचुंदे, राहुल सोनकांबळे, निलेश शिदे, निकम, पो.अं. रवी कांबळे, प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

# मिठागरांवर धावणार रेल्वे टर्मिनस; MRVCकडून जमीन संपादनाची प्रक्रिया सुरु



**■मुंबई। प्रतिनिधी,**

रेल्वे प्रवाशांची वाढती संख्या, मुंबई लोकलसाठी स्वतंत्र कॉरिडोर आणि मुंबईबाहेरून मेल-एक्स्प्रेसची वर्दळ हाताळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने मुंबई महानगरातील मिठागरांच्या जमिनीचा वापर करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. प्रस्तावित ३० सायडिंग मार्गिकांसाठी नायगाव-वसई परिसरात १६ हेक्टर जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या मुंबई शहरी परिवहन प्रकल्प ३ अ अंतर्गत बोरिवली ते विरार पाचव्या-सहाव्या मार्गिका प्रकल्पासाठी मिठागरांच्या जमिनीचा वापर करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. बोरिवली-विरारदरम्यान दोन नव्या मार्गिकांसाठी मिरारोड स्थानक परिसरातील ११ हेक्टर जागा निश्चित करण्यात आली होती. भूसंपादन अंतिम टप्प्यात आल्यावर खासगी व्यक्तीने त्या जागेवर दावा केला. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. याचा परिणाम प्रकल्पावर होऊ नये यासाठी नायगाव-वसई परिसरातील पर्यायी जागा निवडण्यात आली आहे. नायगाव-वसई पश्चिमेतील एकूण १६ हेक्टर जमिनीमध्ये मिठागरांची साडेतीन हेक्टर, खासगी तीन हेक्टर आणि सरकारी दहा हेक्टर जमिनीचा समावेश आहे. भूसंपादनासाठी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्रव्यवहार करण्यात आला आहे, असे एमआरव्हीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुभाषचंद गुप्ता यांनी सांगितले. बोरिवली-विरारदरम्यान २६ किमी लांबीच्या दोन मार्गिकांसाठी २,१८४ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक खारफुटी हटवण्यासह सर्व परवानग्या मिळाल्या आहेत. प्रकल्पात सायडिंग मार्गिका अत्यंत महत्त्वाच्या आहेत. १६ हेक्टर जागेची संयुक्त तपासणी सुरू आहे. तपासणी पूर्ण झाल्यावर भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार आहे. सरकारी ताब्यातील जमीन मोठ्या प्रमाणात असल्याने भूसंपादनाला कोणताही अडथळा येणार नाही. संपादन पूर्ण झाल्यावर प्रकल्पाला सुरुवात करण्यात येणार आहे, असे वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पश्चिम रेल्वेवर मुंबई सेंट्रल आणि वांद्रे टर्मिनसमधून रेल्वेगाड्या सुटतात. सध्या टर्मिनसची क्षमता पूर्ण झाली आहे.

भविष्यातील प्रवासी गरज लक्षात घेता नवीन रेल्वे टर्मिनस उभारणीसाठी जागेचा शोध सुरू आहे. एमआरव्हीसीच्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर याचा फायदा पश्चिम रेल्वेला होणार आहे, असे पश्चिम रेल्वेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. एप्रिल २०१९मध्ये नवी मुंबई विमानतळाला रेल्वे जोड आणि विस्तारीत शहराच्या सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणासाठी एमयूटीपी ३ अ प्रकल्प संच मंजूर करण्यात आला आहे.

# प्रवासी म्हणून रिक्षात बसून प्रवाशांची लुटमार करणाऱ्या रिक्षाचालक गुन्हेगारास पोलिसांनी केली अटक

**■वसई। प्रतिनिधी,**

फियार्दी श्री. जिग्नेश आनंदभाई गोस्वामी वय-३५ वर्षे, धंदा-नोकरी रा-अहमदाबाद शहर, राज्य-गुजरात हे दि.०९/१२/२०२३ रोजी दुपारी-१२.०० वा.सुमारास मिरारोड येथे येवून काशिमिरा येथील हायवे लगतचे सरोजा लॉजिंग येथे थांबले होते. फियादी हे सायंकाळी- १८.३० वा.चे सुमारास त्याचे मित्रांसोबत जवळचे समुद्रा बार अँण्ड रेस्टॉरंट येथे जेवणासाठी जावून राऊ २२.४५ वा. चे सुमारास सरोजा लॉजिंगकडे अजित पॉलेस हॉटेल जवळून पायी चालत जात असतांना पाठीमागून आलेल्या रिक्षास हात दाखवून सरोज लॉजींग येथे सोडण्यास सांगून प्रवाशी म्हणून रिक्षात बसले. फियार्दी यांची रिक्षा सरोजा हॉटेलच्या समोर रोडवर असतांना रिक्षाचे पाठिमागून एका मोटार सायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी रिक्षास मोटार सायकल आडवी लावून थांबवली. त्यानंतर रिक्षाचालक तसेच फियार्दी यांना तुम्ही रिक्षामध्ये ड्रग्ज घेवून जात आहात असे बोलून जबरदस्तीने फियार्दी यांचा अंगावरील सोन्याचे दागीने किमत १,७५,०००/- खेचून चोरून नेले मजकुरचे फियार्दी यांनी दिलेल्या तक्रारी वरून गु.रजि.नं.८११/२०२३ भा.द.वि.सं.क. ३९२,३४ प्रमाणे दि.१०.१२.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा जबरी चोरी व गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. वरिष्ठांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे तपास सुरु केला. फियार्दी यांनी रिक्षातून प्रवास केलेली रिक्षा क्र. १॥॥प-04/710 8214 चे चालकाकडे तपास केला. घटनास्थळ, येणारा व जाणारा मार्ग आणि आजुबाजुचे सी.सी.टी.व्ही.कॅमेरांचे फुटेज तपासले असता नमुद गुन्हयात रिक्षाचालकाचा सहभाग असल्याचा संशय आल्याने त्यास विश्वासात घेवून सखोल तपास केला असता नमुद रिक्षाचालकाने व त्याचे दोन साथीदारांचे मदतीने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

गुन्हयाचे तपासात निष्पन्न आरोपी रिक्षाचालक प्रदिप दिलीप सवादकर वय-२९ वर्षे धंदा-रिक्षाचालक रा-रुम नं-२०१, हनुमान मंदिरच्या बाजुची बिल्डिंग, पेणकरपाडा, काशिमिरा, ठाणे त्याचे साथीदार १) जियाउल्ला ऊर्फ सोनु निजात खान वय-२६ वर्षे, धंदा- रिक्षाचालक रा- के.एन.शेख कंपाउंड, मधुबन बरिल्डिगजवळ, केतकीपाडा, दहीसर-पुर्व, मुंबई, २) अरशद बासीद खान वय-३८ वर्षे, व्यवसाय-रिक्षाचालक रा-गणेश मंदिराजवळ, मिरागाव, मिरारोड-पुर्व, ठाणे यांचा अथक परिश्रमाने शोध घेवून वरील तिघांना दि.१०/१२/२०२३ रोजी अटक केली आहे. पोलीस कोठडी रिमांड मुदतीत आरोपीने चोरी केलेली मालमत्ता, गुन्हयात वापरलेली रिक्षा क्र. ॥॥प-04/10 8214 व मोटार सायकल ॥॥प-47/517 7195 असा एकूण ३,१५,०००/- रुपये किंमतीची मालमत्ता हस्तगत केली आहे. अटक आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीत असून नमुद गुन्हयाचा तपास मा.वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पोउनि/शिवाजी खाडे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे-पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, श्री. महेश तरडे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदिप कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे, श्री.समीर शेख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), स.पो.नि. योगेश काळे, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, सहा.फौ.अनिल पवार, पो.हवा. दिपक वारे, प्रताप पाचुंदे, राहुल सोनकांबळे, निलेश शिदे, निकम, पो.अं. रवी कांबळे, प्रविण टोबरे, किरण विरकर, राजेंद्र सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

# मुंबईत पुन्हा क्लीन अप मार्शल तैनात होणार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

कचरा टाकून, तसेच पान खाऊन ठिकठिकाणी थूंकणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पुन्हा एकदा मुंबईत क्लीन अप मार्शल तैनात करण्याचा निर्णय घेतला आहे. संपूर्ण मुंबईमध्ये ७२० क्लीन अप मार्शलची नियुक्ती करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे अस्वच्छता करणाऱ्यांकडून गुगल पे, फोन पेच्या माध्यमांतून किंवा तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ऑनलाईन पद्धतीने दंड वसूल करण्यात येणार आहे.




प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ, सुंदर मुंबईसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार मुंबई महापालिकेने संपूर्ण स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. मुंबईत अस्वच्छता करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी महानगरपालिकेने पुन्हा एकदा क्लीन अप मार्शल नेमण्याचे ठरवले आहे. काही महिन्यांपूर्वी मुंबईत स्वच्छता दूत नेमण्याची घोषणा महानगरपालिका प्रशासनाने केली होती. दंडात्मक कारवाई न करता केवळ प्रबोधनाच्या हेतूने स्वच्छता दूत नेमण्यात येणार होते. मात्र हा उपक्रम बारगळल्यानंतर आता पुन्हा एकदा क्लीन अप मार्शल नेमण्याचे महानगरपालिका प्रशासनाने ठरवले आहे. प्रत्येक विभागात ३० ते ३५ क्लीन अप मार्शल याप्रमाणे संपूर्ण मुंबईत ७२० मार्शल नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. करोनाकाळात तोंडावर मुखपट्टी न लावणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी पालिकेने मार्शल नेमले होते.मात्र करोना संपल्यानंतर मार्शलची सेवा बंद करण्यात आली होती. महानगरपालिकेने त्यांचे कंत्राट खंडीत केले होते. मुंबई महानगरपालिकेने सर्वप्रथम २००७ मध्ये क्लीन अप मार्शल योजनेची अंमलबजावणी केली होती. मार्शलबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्यामुळे महानगरपालिकेने २०११ मध्ये ही योजना बंद केली. त्यानंतर २०१६ मध्ये पुन्हा एकदा क्लीन अप मार्शलची नेमणूक करण्यात आली होती. त्यावेळीही क्लीन अप मार्शलविरोधात मोठ्या प्रमाणावर तक्रारी येऊ लागल्या होत्या. मार्शल विनाकारण नागरिकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. तसेच पैसे उकळण्याचे, दादागिरी करण्याच्या तक्रारीही केल्या जात होत्या. या कंत्राटाची मुदत २०१८ मध्ये संपुष्टात आल्यानंतर पुन्हा त्यांची नेमणूक केली नव्हती. करोनाकाळात मुखपट्ट्या न लावणाऱ्यांविरोधातील कारवाईसाठी पुन्हा एकदा क्लीन अप मार्शलच्या नेमणूका केल्या होत्या. आता पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांनी स्वच्छता मोहीम हाती घेतल्यामुळे क्लीन अप मार्शलच्या नेमणूकांना गती आली आहे. यंदा मात्र दंडात्मक वसुलीसाठी ऑनलाईन माध्यम ठेवण्याचा पालिकेचा विचार आहे. ऑनलाईन पद्धतीने दंड गोळा करण्याचा यापूर्वीही प्रयत्न करण्यात आला होता. मात्र ती योजना बारगळली होती. यावेळी मात्र विविध तांत्रिक पर्याय तपासून बघितले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे, रस्त्यावर स्नान करणे, मलमूत्र विसर्जन करणे अशा प्रत्येक चुकांसाठी २०० रुपये ते एक हजार रुपये दंड वसूल केला जाणार आहे. वसूल केलेल्या दंडापैकी ५० टक्के रक्कम क्लीन अप मार्शलचा पुरवठा करणाऱ्या संस्थेला, तर पन्नास टक्के रक्कम पालिकेला मिळणार आहे.

# पिंपरी-चिंचवडकरांसाठी मोठी बातमी : पाणीप्रश्न सुटणार, आता 'या' धरणातून मिळणार पाणी



**■पिंपरी। प्रतिनिधी,**

शहराचा लोकसंख्या वाढीचा दर आणि सन २०४१ पर्यंतची लोकसंख्या विचारात घेऊन मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी शहरासाठी आरक्षित करण्याची मागणी राज्य सरकारच्या जलसंपदा विभागाकडे केली आहे. यासाठी लागण्यात येणारा पुनर्स्थापना खर्च देण्याची तयारी महापालिका प्रशासनाने दाखविली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांना मुळशी धरणातील पाणी शासन देणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला गेल्या चार वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. शहर चारही बाजूने झपाट्याने वाढत असून, लोकसंख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. शहराची लोकसंख्या आजमितीला २७ लाखांवर पोहोचली आहे. शहरासाठी पवना धरणातून ५१०, आंद्रातून १००, भामा-आसखेड धरणाचे १६७ असे ७७७ दशलक्ष लीटर पाणी आरक्षित आहे. सध्या शहरवासीयांना दिवसाला पवना धरणातून ५१०, चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रातून ७० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १३ असे ५९३ दशलक्ष लीटर पाणी देण्यात येत आहे. त्यानंतरही शहरातील विविध भागांतील सोसायट्यांना कमी दाबाने आणि अपुरा पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत.

सध्याच्या लोकसंख्या वाढीचा वेग लक्षात घेता २०३१ मध्ये शहराची लोकसंख्या ५२ लाख ७४ हजार तर २०४१ मध्ये ९६ लाख तीन हजार लोकसंख्या होईल, असे अनुमान गृहित धरण्यात आले आहे. या लोकसंख्येला सुमारे १५०० दशलक्ष लीटर पाणी आहे. त्यामुळे भविष्याचे आतापासून नियोजन करणे काळाची गरज आहे.

त्यानुसार महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने तयारी सुरू केली आहे. लोणावळा येथील टाटा कंपनीच्या मुळशी धरणातून ७६० दशलक्ष लीटर पाणी मिळावे, असे पत्र महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने जलसंपदा विभागाला दिले आहे. पिण्याचे पाण्याचे आरक्षण औद्योगिक, व्यावसायिक व घरगुती या प्रकारामध्ये विभागून देणे आवश्यक आहे.

# अंधेरी स्थानकावर तिकीट तपासनीस, सुरक्षा जवान तैनात



**■मुंबई। प्रतिनिधी,**

पश्चिम रेल्वेवरील अंधेरी स्थानक सर्वाधिक गर्दीच्या स्थानकांपैकी एक स्थानक आहे. या स्थानकातून विनातिकीट प्रवाशांची संख्या अधिक आहे. त्यामुळे पश्चिम रेल्वेने विनातिकीट प्रवाशांना पकडण्यासाठी मंगळवारी अंधेरी स्थानकात तिकीट तपासणी मोहीम राबविली. यासाठी ३६ तिकीट तपासनीस आणि १० आरपीएफ आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान असे ४६ जणांची फौज अंधेरी स्थानकात तैनात होती. फक्त आठ तासात ९९९ विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करून २.६५ लाख रुपयांचा महसूल गोळा करण्यात पश्चिम रेल्वेला यश मिळाले आहे. पश्चिम रेल्वेवरील विनातिकीट प्रवाशांचा सुळसुळाट वाढला आहे. त्यामुळे ३० सप्टेंबर २०२३ रोजी पश्चिम रेल्वेच्या दादर स्थानकात १९५ तिकीट तपासनीस तैनात करण्यात आले. यात तब्बल १,६४७ विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करून ४ लाख २१ हजारांचा दंड वसूल केला. त्यानंतर ३ ऑक्टोबर २०२३ रोजी अंधेरी येथे १९९ तिकीट तपासनीसाद्वारे २,६९३ विनातिकीट प्रवशांना पकडले.

# विक्रोळी-जोगेश्वरी लिंक रोडवर शस्त्रास्त्रासह एकाला अटक



**■मुंबई। प्रतिनिधी,**

गुन्हे शाखेच्या कक्ष ७ मधील अधिकाऱ्यांनी मुंबईतील जोगेश्वरी - विक्रोळी लिंक रोड परिसरात कारवाई करून ३६ वर्षीय व्यक्तीला शस्त्रास्त्रांसह अटक केली. त्याच्याकडील दोन पिस्तुले व आठ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. आरोपी नवी मुंबईतील रहिवासी असून त्याच्याविरोधात भारतीय हत्यारबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे. मुन्ना राजबली दुबे (३६) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो नवी मुंबईतील कोपर खैराणे परिसरात राहतो. जोगेश्वरी-विक्रोळी लिंकरोड परिसरातील पवार वाडी येथे एक संशयीत शस्त्र घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या कक्ष-७ मधील पोलिसांनी परिसरात सापळा रचला होता. या परिसरात संशयीतरित्या फिरणाऱ्या दुबेला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली दोन पिस्तुले, चार मॅगझीन व आठ जिवंत काडतुसे सापडली. त्याच्याविरोधात भारतीय हत्यारबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पवई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास गुन्हे शाखेच्या कक्ष-७ मधील पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. आरोपी नेमक्या कोणत्या कारणासाठी येथे शस्त्र घेऊन आला होता याबाबत तपास सुरू आहे. दुबेच्या चौकशीत अन्य संशयीत आरोपींची माहिती मिळाली असून त्याबाबत गुन्हे शाखेतील पोलीस अधिक तपास करीत आहेत.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 1, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, गजाराम को. ऑ.हौ.सो. चंदनवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898